# कुडाळ येथे २०० ज्येष्ठांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी

## मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे सर्वरोग निवारण शिबिर



कुडाळ : प्राथमिक आरोग्य केंद्रात २०० रुग्णांनी आरोग्य तपासणी केली. या शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. (छाया : अतुल देशपांडे)

सातारा, दि. २५ (प्रतिनिधी) - फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. आणि त्यांचे सीएसआर भागिदार संस्था असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशन यांच्यातर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केलेल्या सर्वरोग निवारण (जेरिएट्रिक) शिबिरात २०० ज्येष्ठांनी आपली आरोग्य तपासणी आणि निदान पुण्यातील प्रसिध्द रुग्णालयातून आलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांच्याकडून करुन घेतली. जावली तालुक्यातील कुडाळ प्राथमिक आरोग्य केंद्रात हे शिबिर दिवसभर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात एच. व्ही. देसाई रुग्णालयातून नेत्ररोगतज्ज्ञ, ससून सर्वसाधारण रुग्णालयातून मानसोपचार तज्ज्ञ, भारती विद्यापीठातील फिजिशियन, स्त्रीरोग तज्ज्ञ आणि दंतरोग तज्ज्ञ, नाक-कान-घसा तज्ज्ञ आणि संचेती हॉस्पिटलमधून हाडरोगतज्ज्ञ आणि भौतिकोपचार तज्ज्ञ यांनी शिबिरात ज्येष्ठांची तपासणी केली.

या शिबिराला मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) डॉ. कैलास शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांचे सहकार्य लाभले. कुडाळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राने आशा (मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्ता) कर्मचारी, एएनएस (ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ) आणि उपलब्ध आरोग्य अधिकाऱ्यांच्या मदतीने तज्ज्ञ डॉक्टरांना मदत केली. सातारा जिल्हा रुग्णालयाने राष्ट्रीय आरोग्य मोहिमेअंतर्गत (एनएचएम) मोफत रक्तातील साखर अर्थात रक्तशर्करा चाचणी पुरविली होती.

संस्थेच्या स्थापनेपासून फिनोलेक्स आणि मुकुल माधव यांनी आरोग्यसेवा क्षेत्रावर आपला भर ठेवला आहे. सन २००६ पासून पुणे-रत्नागिरी पट्ट्यात २२ शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन दोन्ही संस्थांनी मिळून आतापर्यंत केले आहे. या शिबिरांच्या माध्यमातून दरवर्षी १६,००० मुलांच्या रोगनिदान होते.

संस्थेने सन २०१५ पासून एफआयएल आणि एमएमएफ सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांच्या रोगनिदान, उपचार आणि गरज असलेली साधने पुरविण्याचे कार्य करत आहे. तसेच, १२ प्राथमिक आरोग्य केंद्रातील ५८२ आशा आणि एएनएम कर्मचारी अत्यंत जोखमीच्या प्रसूती टाळण्यासाठी महिलांची तपासणी करण्यासाठी प्रशिक्षित करण्यात आल्या आहेत. जून २०१८ पासून आशा आणि एएनएम यांना आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचार आणि इतर आरोग्यसेवा कशी द्यावी यासाठी द गोल्डन अवर प्रशिक्षण देण्याचा उपक्रम ही संस्थेने हाती घेतला आहे.

या शिबिरात जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व आरोग्य सभापती वसंतराव मानकुमरे, पंचायत समिती सदस्य सौरभ शिंदे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिते, कुडाळ केंद्राचे डॉ. रासकर, डॉ. मिरजकर, डॉ. शेलार, कुडाळचे सरपंच शिंदे उपस्थित होते.